## अमरावती महानगरपालिका, अमरावती
## दिनांक 19.5.2023 रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक 83 -** अमरावती स्थित मौजे बडनेरा सर्व्हे क्र.273 मधील 1.25 हे.आर जागेवरील मंजुर विकास योजना (सु) मधील वि.यो.आरक्षण क्र.305 अ साईट ॲन्ड सर्व्हीसेसचे आरक्षण वगळुन पब्लीक ॲमेनिटी करीता जागा आरक्षीत करण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधि.1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करणेबाबत.

**ठराव क्रमांक 83 -** मौजे बडनेरा सर्व्हे क्र. 273 मधील क्षेत्र 1.25 हे.आर जागा मनपा मालकीची आहे. सदर जागा महानगरपालिकेने हुडको योजने अंतर्गत आर्थिक दृष्टया कमकुवत ,अल्प,मध्यम,उच्च उत्पन्न गट लोकांना प्लॉट व घर उपलब्ध करुन देणे साठी खरेदी केली होती. सदर जागा कोषाध्यक्ष/सदस्य श्री. गजानन महाराज शिक्षण संस्था अमरावती यांनी शैक्षणिक व क्रिडांगण विकासा करीता कायमस्वरुपी मालकी हक्काने किंवा भाडेपट्टयाने मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 ग (चार) नुसार शैक्षणिक प्रयोजनासाठी आवेदक संस्थेस नाममात्र भाडेपटट्याने जागा उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास त्यास राज्य शासनाची मान्यता घेणे अनिवार्य आहे .त्या अनुषंगाने मा. आयुक्त यांचे आदेशान्वये सर्वसाधारण सभा ठराव क्र.50दिनांक 06/12/2022 अन्वये ठराव मंजुर करण्यात आला आहे.त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 ग (चार) नुसार शासन मान्यतेकरीता पत्र क्र.1572/2022 दिनांक 07/12/2022 अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता .

सदर पत्राच्या अनुषंगाने श्री. गजानन महाराज शिक्षण संस्था अमरावती ला शैक्षणिक व क्रिडांगण विकास या प्रयोजनाकरीता दिर्घ मुदतीच्या कालावधीसाठी भाडेपटट्याने उपलब्ध करुन देण्याबाबत प्रथम आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांनी सदर क्षेत्रावरील आरक्षणाचे प्रयोजनात बदल करण्याकरीता नगर रचना विभागाकडे प्रस्ताव सादर करणे आवशयक

आहे.या प्रस्तावावर गुणवत्तेनुसार नगर रचना विभागाव्दारे प्रथम निर्णय घेण्याची कार्यवाही करावी.सदर प्रकरणी गुणवत्तेनुसार निर्णय झाल्यानंतर आवश्यकते नुसार शासनास प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही करावी, असे शासनाचे पत्रक्र. अमपा-1322/प्र.क्र.244/नवि -26 दिनांक 23 मार्च 2023 अन्वये आदेश प्राप्त झाले आहे.

सदर शासन आदेशान्वये उक्त जागा महानगरपालिका प्रशासना मार्फत श्री.गजानन महाराज शिक्षण संस्था अमरावती ला शैक्षणिक व किंडागण विकास या प्रयोजनाकरीता दिर्घ मुदतीच्या कालावधीसाठी भाडेपट्टयाने उपलब्ध करुन देण्याबाबत विचाराधीन आहे.करीता सदर जागा वि. यो.आरक्षण क्र.305 अ साईट ॲन्ड सर्व्हीसेस या आरक्षणातुन वगळुन पब्लीक ॲमेनिटी करीता जागा आरक्षीत करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधि. 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करण्यास शहर सुधार समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सदर विषयास मंजुरी प्रदान करावी .तसेच सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधि. 1966 चे कलम 37 नुसार नागरीकांचे हरकती व सुचना नोंदवुन त्याबाबत फेरबदलाचा प्रस्ताव तयार करुन अंतिम ठराव पुन्हा मान्यतेकरीता नियोजन प्राधिकरणाकडे न पाठवता सरळ फेरबदल प्रस्ताव शासनाकडे सादर करावयाचे अधिकार ही प्रशासनास देण्यात यावे. सदर प्रशासकीय विषयास मा.आयुक्त यांनी दि.18.05.2023 ला मान्यता प्रदान केली आहे.

उपरोक्त प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेच्या मंजुरी करिता सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासकयांना असल्याने प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा./-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा./-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.